**K.P.C. PUBLIC SCHOOL, KHARGHAR**
**ASSESSMENT IV 2023-24**

**GRADE: Vl** — **Marks : 100**
**SUB: Marathi** — **TIME: 3 HRS**

<u>विभाग -अ</u>

प्रश्न.1.अ पुढील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा. (७)

खूप जुनी गोष्ट. विजयनगरमध्ये तेव्हा कृष्णदेवराय राज्य करत होते. त्यांच्या प्रधानांचे नाव होते अप्पाजी अप्पाजी फार चतुर होते.उत्तरेकडे कलिंग राज्य होते त्या राज्याच्या राजाला वाटले, एकदा आपणही अप्पाजींची चतुराई पाहावी म्हणून त्याने कृष्णदेवरायाना निरोप पाठवला. 'तुमच्या राज्यात फार चवदार कोबी पिकतात असे मी ऐकले आहे. त्यांचा आस्वाद घेण्याची माझी इच्छा आहे. माझ्यासाठी काही कोबी पाठवाल का ?'कलिंग राजाला कोबी पाठवण्याची कृष्णदेवरायांना इच्छा होती; पण ते पाठवणार कसे? त्या काळी आजच्यासारखी वाहतुकीची जलद साधने नव्हती बाहतूक चालायची ती बैलगाड्यामधून बैलगाड्या फलिग राज्यात पोहोचायला तीन महिने लागत. आपण चांगली, ताजी कोबी पाठवली, तरी ती कलिंग राज्यात जाईपर्यंत कुजून जातील असे राजाला बाटले 'आपली शंका त्यानी अप्पाजींना सांगितली, अप्पाजी म्हणाले, "त्यात काय अवघड आहे? एका बैलगाडीत गाडीवानाला बसण्यापुरती जागा सोडून बाकीच्या जागेत माती भरा त्या मातीत कोबीचे बी पेरा. रोज कोबीच्या रोपाना पाणी देत पुढे जायला गाडीबानाला सांगा, गाडी कलिंग राज्यात पोहोचेपर्यंत कोबी तयार होतील.

अ. चौकटी पूर्ण करा.

१. विजयनगरचा राजा ☐ १
२. कृष्णदेवराय यांचा प्रधान ☐ १
३. परीक्षा घेणाऱ्या राजाचे राज्य ☐ १
४. कलिंग हे या दिशेचे राज्य ☐ १

आ एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा :

१. आप्पाजींनी बैलगाडीत कशाचे पीक घ्यायला लावले? १
२. कलिंग राजाला कोणती वस्तू पाठवण्याची कृष्णदेवरायांची इच्छा होती? १
३. बैलगाड्या कलिंग राज्यात पोहोचायला किती महिने लागतात? १

प्रश्न. 1.ब पुढील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा. (७)

<u>चिमणी</u> : चिव चिव चिव गं! तिकडे तू कोण गं ?
<u>गाय</u> : अगं मी कपिला मावशी का गं चिऊ उदास दिसशी ?
<u>चिऊ</u>: काय सांगू गाई गाई,छाती धडधडते पहा बाई! काय करू सुचतच नाही! भीती फार वाटते बाई॥
<u>गाय</u> : अगं अगं चिऊताई । मोबाईलचा आवाज, तुज सहन न होई ॥ तू आहेस नाजुकशी । आवाजाने होशी कासाविशी ॥ (गायही आपले डोळे पुसते.)
<u>चिऊ</u> : कपिला मावशी काय गं झाले ? तुझेसुद्धा डोळे का पाणावले ?
<u>गाय</u> : काय सांगू चिऊताई ! प्लॅस्टिकचा बघ ढीग किती ? घासाबरोबर प्लॅस्टिक जाते माझे तर पोटशूळच उठते !!

चिऊ:काय करावे, सुचत नाही मानव शहाणा होतच नाही.

गाय:चल गं जाऊ तलावावर, पाणी पिऊ घोटभर ।

मासोळी : अगं इथले जल विषारी । तगमग जीवाची होते भारी ॥ पाणी आहे घाण घाण । तडफडती जलचरांचे प्राण ॥-

गाय :(माणसाला उद्देशून बोलते.)

का मुक्या प्राण्यांना देता त्रास ?

का जंगलांचा करता ऱ्हास ? वाघोबा मग घालतात झडप तुम्हांलाच करतात पोटात गडप !

सर्व प्राणी :मानवा मानवा ऐक तर खरे. वनचरे आता नच तुझे सोयरे करत राहाशील जर प्रदूषित सारे धरती माता देईल दूषणे तडफडशील मग दूधाविना तडफडशील मग अन्नाविना तेव्हाच होईल आमचे स्मरणजागृत होऊन राखशील पर्यावरण पर्यावरण! पर्यावरण !

अ. आकृत्या पूर्ण करा :

१ गाईने माणसाला विचारलेला प्रश्न ☐ १

२.गाईने माणसाला विचारलेला प्रश्न ☐ १

३.प्राण्यांच्या मते, माणूस यांवाचून तडफडेल ☐ १

आ. एका वाक्यात उत्तरे लिहा .

१. या पाठात कोणाकोणात संवाद झाला आहे? १

२. गाईचे नाव काय होते? १

३. चिमणीला कशाचा आवाज सहन नाही होत? १

४. गाईचे डोळे का पाणावले? १

प्रश्न. 2.अ..पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा (७)

होळी आली होळी खावी पुरणाची पोळी, झाडे, फांदया तोडू नका, केर-कचरा खड्ड्यात टाका.

होळी आली होळी भरा सद्गुणांची झोळी, अनिष्ट रूढी, प्रथांची बांधू होळीसाठी मोळी.होळी आली होळी ठेवू पर्यावरणाचे भान, नका तोडू वृक्ष राजी घ्यावी आज अशी आण.

होळी आली होळी पळून गेली दूर थंडी, ऊन आता लागलंय वाढू काढा कपाटातून बंडी.

अ.आकृती पूर्ण करा

१. होळीचा करायचा गोड पदार्थ ☐ १

२. केळ कचरा टाकायचे ठिकाण ☐ १

३. दूर पळून गेलेली ☐ १

४. अंगात घालायची ☐ १

आ.एका वाक्यात उत्तरे लिहा .

१.कवीने काय तोडण्यास मनाई केली आहे? १

२.होळीच्या वेळी झोळी कशाने भरावी ? १

३.होळीसाठी मोळी कशाची बांधावी ? १

प्रश्न.२ ब.पुढील कवितेच्या आधारे सूचनांनुसार कृती करा :

उन्हात घामेजुनी अंगाची होतीया लाहीलाही सूर्यकिरणांची लागती उष्णगरम झळाई, आठवते दग्ध उन्हातली थंडगार सराई वटवृक्षाच्या सावलीत थाटलेली पाणपोई.

रखरखत्या उन्हात सुटतो अवखळ वारा धुळीसंगे पालापाचोळा जाई या उंच अंबरा, थकलेल्या वाटसरूला ग्लानी येती गरागरा पिऊनी पाण्याचा घोट तेव्हा महत्त्व कळे खरा.या दिवसांत चोहीकडे पडते कडक ऊन सारखीसारखी लागते साऱ्यांना मोठी तहान, पिण्यास ठेवतात पाण्याने भरलेले रांजण 'रंक असो वा राव, ' हे पाणी पितात सारेजण !

अ.चौकटी पूर्ण करा :

१.रखरखत्या उन्हात सुटणारा [ ] १

२.सूर्यकिरणांची लागलेली [ ] १

३.दिवसा चोहिकडे पडणारे [ ] १

४.ग्लानी येऊन थकणारे [ ] १

आ.१. आ. एका वाक्यात उत्तरे लिहा.

१.अंगाची लाही लाही कशामुळे होते? १

२.अवखळ वारा सुटल्यावर काय होते? १

३.थकलेल्या वाटसरूला ग्लानी का येते? १

प्रश्न ३.अ. पुढील अपठित उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा. (७)

पाऊस केव्हा पडेल? किती पडेल? याची देशभर चिंता असते. ही चिंता दूर करण्यासाठी ज्या संशोधकाने मान्सूनच्या अंदाजाची नवी पद्धत शोधून काढली त्यांचे नाव डॉ. वसंत गोवारीकर.

डॉ. वसंत गोवारीकरांचा जन्म २५ मार्च १९३३ रोजी पुण्यात झाला. शाळेत असताना त्यांना नवनव्या कल्पना सुचायच्या. एकदा त्यांना वाटले आपण मोटार बनवावी. अवघे तेरा वर्षांचे असताना डॉ. गोवारीकर यांनी थेट अमेरिकेतील हेन्री फोर्डला पत्र लिहून आपली इच्छा कळवली. फोर्डला मराठी कळणार नाही, म्हणून त्यांनी मित्राची मदत घेऊन मराठीत लिहिलेल्या पत्राचे इंग्रजी भाषांतर केले. हेन्री फोर्डने डॉ. गोवारीकर यांच्या पत्राची दखल घेऊन उत्तरही पाठवले. त्यासोबत काही पुस्तकेही पाठवली. त्यांच्या कुशाग्र बुद्धिमत्तेची आणि दृढ संकल्पाची चुणूक लहानपणीच दिसून आली.

कोल्हापूरला पदवीपर्यंतचे शिक्षण झाल्यानंतर उच्च शिक्षणासाठी ते इंग्लंडला गेले. बर्मिंगहॅम विदयापीठात त्यांनी 'रासायनिक अभियांत्रिकी' विषयात संशोधन केले. पुढे इंग्लंडच्या ऊर्जा संशोधन केंद्रात संशोधक म्हणून त्यांनी काम केले.विक्रम साराभाई यांच्या आग्रहामुळे १९६७ साली ते भारताच्या अवकाश संशोधन केंद्रात रुजू झाले. 'घन पदार्थातील ऊर्जा' या विषयाच्या संशोधनासाठी त्यांच्या पुढाकाराने नवा प्रकल्प सुरू करण्यात आला.

अ. आकृती पूर्ण करा.

१.मान्सूनच्या अंदाजाची नवी पद्धत शोधून काढली त्यांचे नाव [ ] १

२.गोवारीकरांचे जन्मगाव [ ] १

३.अमेरिकेतील जागतिक कीर्तीचे मोटार बनवणारे [ ] १

४.वयाच्या या वर्षी फोर्डला पत्र लिहिले [ ] १

आ.१. एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. कोणाच्या आग्रहामुळे डॉक्टर गोवारीकर भारताच्या अवकाश संशोधन केंद्रात रुजू झाले? १

२. डॉक्टर गोवारीकर इंग्लंडला गेल्यावर कोणत्या विषयात संशोधन केले? १

३. कोणती चिंता दूर करण्यासाठी डॉक्टर गोवारीकर यांनी नवीन पद्धत शोधून काढली १

प्रश्न 3. ब.पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा (७)

असावा सुंदर चॉकलेटचा बंगला, चंदेरी सोनेरी चमचमता चांगला...
चॉकलेटच्या बंगल्याला टॉफीचं दार, शेपटीच्या झुपक्यानं झाडून जाईल खार...
गोल गोल लेमनच्या खिडक्या दोन, 'हॅलो, हॅलो' करायला छोटासा फोन
बिस्कटांच्या गच्चीवर मोर छानदार, पेपरमिंटच्या अंगणात फुलं लाल लाल....
चांदीच्या झाडामागं चांदोबा रहातो, मोत्याच्या फुलांतून लपाछपी खेळतो...
उंच उंच झोक्याचा खेळ रंगला, मेनेचा पिंजरा जरा वर टांगला....
किती किती सुंदर, चॉकलेटचा बंगला... चंदेरी सोनेरी, चमचमता चांगला

अ.आकृती पूर्ण करा.

१. सुंदर बंगला कशाचा असावा [ ] १

२. बंगल्याचे दार, [ ] १

३. हॅलो, हॅलो' करायला छोटासा [ ] १

४. पेपरमिंटच्या अंगणात फुलं [ ] १

आ.एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. चॉकलेटचा बंगला कसा असावा? १

२. मेनेचा पिंजरा कुठे बंगला आहे? १

३. बिस्कटांच्या गच्चीवर का आहे? १

प्रश्न ३. क. पाठाच्या आधारावर विचारलेल्या (कोही ४) प्रश्नांची उत्तरे लिहा. (१२)

१.अप्पाजींच्या मते, उत्तम माणूस कोणता ? ३

२.शिंपल्यामध्ये मोती कसा तयार होतो? क्रमाने क्रिया लिहा. ३

३.चंद्रावरच्या शाळेत चांदण्यांशीच का खेळावे लागणार आहे ? ३

४.'मुक्या प्राण्यांची कैफियत' या पाठातून कोणता संदेश दिला आहे? ३

५.'पर्यावरणाचे भान ठेवून होळी साजरी करा' याबाबत तुमचे मत दोन तीन वाक्यात लिहा. ३

विभाग 'ब'. (२४)

प्रश्न ४. सूचनानुसार कृती करा.

१. समानार्थी शब्द लिहा. (२)

१. किनारा - २. मासा -

२.विरुद्धार्थी शब्द लिहा. (२)

१. आली - २. अवघड -

३. पुढील दिलेल्या शब्दांचे अनेक वचन लिहा. (२)

१.पोळी - २. खिडकी -

४. लिंग ओळखा. (२)

१. होळी - २. वाघ-

५. लिंग बदला. (२)

१. चिमणी- २. नाग -

६. पुढील वाक्यात चे काळ ओळखा. (३)

१. रखरखत्या उन्हात अवखळ वारा सुटतो.

२. जागोजागी पाणपोई बांधल्या जातील.

३. सुभाष माझा मित्र होता.

७. खालील वाक्यातील क्रियापद ओळखा. (२)

१. शांता ने गजरा बनवला.

२. सचिन क्रिकेट खेळतो.

८. सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (३)

(१) होळी आली. (नाम ओळखा.)

(२) तिला पुरणपोळी दे. (सर्वनाम ओळखा.)

(३) हसरी मुले सर्वांना आवडतात. (विशेषण ओळखा.)

९. पुढील वाक्यांत योग्य वाक्प्रचार करा. (२)

१. नजरेआड होणे २. खाऊ पिऊ घालणे

१०. पुढील शब्दांचा शब्दसमूह लिहा . (२)

१. दैनिक २. साप्ताहिक

११. पुढील वाक्यातील रिकाम्या जागी कंसातील योग्य विशेषण लिहा. (२)

(टवटवीत, उंच, नवा, शंभर)

1. हिमालय पर्वत आहे.

२ बागेत फुले आहेत.

<u>विभाग 'क'</u>

प्रश्न ५अ) खालील दिलेल्या कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. (७)

१ प्रदूषण एक समस्या २. माझा आवडता सण होळी

प्रश्न ५ ब) प्रश्न. खालील दिलेल्या कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा. (५)

१. तुम्हाला निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला आहे ते वडिलांना पत्राद्वारे कळवा.

२. गुरूजींना सुट्टीसाठी अनुमती मागणारे पत्र लिहा.

प्रश्न 6 अ) खालील दिलेल्या विषयावर मुद्द्यांच्या आधारावर कथा लिहा व तात्पर्य लिहा. (५)

१) एकीचे बळ फार मोठे असते

मुद्दे: चार गाई - एकमेकींच्या मैत्रीणी.. एका सिंहाने त्यांना बघितले त्याच्या.. तोंडाला पाणी सुटले सिंह - जवळ येताच गाईंनी प्रतिकार केला थोड्या दिवसानंतर.. गाईच्यात भांडण झाले चरण्यासाठी त्या वेगवेगळ्या - जाऊ लागल्या सिंहाने पाहिले एक एक करत सहजपणे सर्व गाईंना संपविले. - -

प्रश्न 6 ब) खालील दिलेल्या कोणतीही विषयावर आकर्षक जाहिरात लिहा. (५)

१.आयुर्वेदा' साबणाचे जाहिरात लिहा.